दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०४३ • पुणे • शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

ठळक बातम्या

ससून रुग्णालयात केटामाईन थेरपी सुरू

पुणे (आरंभ पर्व) : आत्महत्येचे विचार तीव्र असलेल्या रुग्णांना पारंपरिक उपचारांना बाजूला ठेवून आधुनिक केटामाईन थेरपी उपचार देऊन त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी फायदेशीर ठरत आहे. ससून रुग्णालयात नुकतीच ही औषधोपचार पद्धत सुरू करण्यात आली आहे. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र 'छात्र मानस कक्ष' सुरू करून त्यांना कौशल्यपूर्ण शिक्षण देऊन मानसिक अडचणींवर वेळीच संवाद आणि समुपदेशनाबाबत धडे दिले जात आहेत. गंभीर नैराश्य, उपचारांना अपेक्षित प्रतिसाद न मिळणारी मानसिक अवस्था किंवा आत्महत्येचा वाढलेला धोका असलेल्या काही रुग्णांमध्ये औषधोपचार आणि इलेक्ट्रोकन्व्हल्सिव्ह थेरपी यांच्यासोबत रुग्णाच्या गरजेनुसार केटामाईनचा विचार केला जात आहे.

जमिनींच्या मोजणीत अडथळा!

पुणे (आरंभ पर्व) : सर्व्हे ऑफ इंडियाची भूमी अभिलेख विभागाच्या मोजणीसाठी महत्त्वाची असलेली जीपीएस यंत्रणा गेल्या आठ ते दहा दिवसांपासून तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली आहे. याचा परिणाम राज्यातील जमिनींच्या मोजणी प्रक्रियेवर झाला असून, अनेक मोजणी प्रकरणे रखडली आहेत. ही यंत्रणा सुरू झाल्यानंतर प्रलंबित मोजणी प्रकरणे मार्गी लावण्यावर भर दिला जाणार असल्याची माहिती भूमी अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. जमिनींची अचूक मोजणी करणे, जमिनींच्या हद्दी निश्चित करणे तसेच विविध प्रकारच्या मोजणी प्रकरणांमध्ये आवश्यक तांत्रिक माहिती मिळवण्यासाठी जीपीएस यंत्रणेचा वापर केला जातो. मात्र, सर्व्हे ऑफ इंडियाची ही यंत्रणा बंद पडल्याने मोजणीच्या कामात अडथळे निर्माण झाले आहेत. परिणामी, नियोजित वेळेत मोजणी पूर्ण करण्यावर मर्यादा आल्या असून, त्याचा फटका मोजणीसाठी प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांना बसत आहे.

पूर्वसूचना न देता पाणी बंद

पुणे (आरंभ पर्व) : आधीच आठवड्यातून एक दिवस पाणीकपात, त्यात रस्त्याच्या कामांमुळे विस्कळीत झालेला पुरवठा आणि आता कोणतीही पूर्वसूचना न देता गुरुवारी पाणी बंद! अशा तिहेरी कोंडीत कात्रज परिसरातील नागरिक सापडले आहेत. मंगळवार आणि बुधवारीच पाणी न मिळालेल्या भागांतील नागरिकांना गुरुवारच्या अतिरिक्त पाणीबंदमुळे सलग दोन ते तीन दिवस पाण्यासाठी वणवण करावी लागली.

फुटपाथवरून चालणे हा मूलभूत अधिकार

सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

फुटपाथ बांधणे, देखभाल करणे आणि सुरक्षित ठेवणे स्थानिक प्रशासनाची जबाबदारी

- संदर्भ : सर्वोच्च न्यायालय, Maniyar Iliyaz @ Shaik Riyaz & Anr. v. P. Ayyappan & Ors., निर्णय दिनांक १९ जून २०२६, २०२६ INSC 647.



पुण्यासह देशातील शहरांसाठी निर्णय महत्त्वाचा

पुण्यासारख्या वेगाने विस्तारत असलेल्या शहरांमध्ये वाढती वाहनसंख्या, वाहतूक कोंडी, अरुंद रस्ते, फुटपाथवरील अतिक्रमणे आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचे प्रश्न सातत्याने समोर येतात. ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिला, दिव्यांग व्यक्ती आणि लहान मुलांसह सर्वसामान्य पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालता येईल, अशी व्यवस्था निर्माण करणे ही शहर नियोजनाची महत्त्वाची गरज आहे.

दुर्दैवी अपघातातून पुढे आला पादचाऱ्यांच्या हक्कांचा प्रश्न

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर एका पित्याने आपल्या पाच वर्षांच्या मुलाला शाळेत सोडण्यासाठी घरातून पायी प्रवास सुरू केला होता. मात्र, रस्त्यावर फुटपाथ आणि पादचारी क्रॉसिंग नसताना मागून आलेल्या टँकरने मुलाला धडक दिली. या अपघातात मुलाचा मृत्यू झाला. त्यानंतर नुकसानभरपाईसंदर्भातील कायदेशीर लढाई सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचली. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अपघाताच्या नुकसानभरपाईचा प्रश्न हाताळतानाच पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेविषयी व्यापक घटनात्मक भूमिका मांडली. न्यायालयाने अपीलकर्त्यांना ११ लाख ४४ हजार ६२८ रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे निर्देशही दिले. या निर्णयातून पादचाऱ्यांच्या हक्कांना केवळ वाहतूक व्यवस्थेतील दुय्यम बाब न मानता मूलभूत अधिकार म्हणून पाहण्याची गरज अधोरेखित झाली.

महापालिका आणि स्थानिक प्रशासनाची जबाबदारी निश्चित

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, एखादा रस्ता अस्तित्वात असेल, तर त्या रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांसाठी निश्चित केलेले आणि सुस्थितीत ठेवलेले फुटपाथ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर आहे. शहरी विकास प्राधिकरणे, महापालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायती यांनी आवश्यकतेनुसार फुटपाथ निश्चित करणे, त्यांची निर्मिती करणे, नियमित देखभाल करणे आणि ते सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. पायी चालणे हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने पादचारी सुविधांकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले. या भूमिकेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजावर महत्त्वाची जबाबदारी येते. रस्ते बांधताना किंवा त्यांचे रुंदीकरण करताना पादचाऱ्यांच्या गरजांचा विचार करणे, फुटपाथची सलगता राखणे आणि नागरिकांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे आवश्यक ठरणार आहे.

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

रस्त्यावरून सुरक्षितपणे चालणे ही केवळ नागरिकांची गरज नसून तो त्यांचा मूलभूत अधिकार आहे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. मोटार वाहनांच्या वाहतुकीपेक्षा पादचाऱ्यांच्या हक्कांना प्राधान्य दिले पाहिजे, असे स्पष्ट करत न्यायालयाने सुरक्षित आणि स्पष्टपणे निश्चित केलेल्या फुटपाथच्या उपलब्धतेला घटनात्मक संरक्षण दिले आहे. या निर्णयामुळे देशभरातील पादचाऱ्यांच्या हक्कांच्या संरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, फुटपाथच्या नियोजनाकडे आणि देखभालीकडे दुर्लक्ष करणाऱ्या स्थानिक प्रशासनाच्या जबाबदारीवरही प्रकाश पडला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठाने १९ जून २०२६ रोजी Maniyar Iliyaz @ Shaik Riyaz विरुद्ध P. Ayyappan या प्रकरणात हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. या निर्णयात न्यायालयाने चालण्याचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या भाग तीनमधील मूलभूत अधिकार असल्याचे स्पष्ट केले. हा अधिकार संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(ड) मधील मुक्तपणे संचार करण्याच्या अधिकाराशी तसेच अनुच्छेद २१ मधील जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या अधिकाराशी संबंधित असल्याचे न्यायालयाने नमूद केले. देशातील अनेक शहरांमध्ये रस्त्यांचे रुंदीकरण, वाहनांची वाढती संख्या, वाहतूक कोंडी आणि पार्किंगच्या समस्यांवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. मात्र, पायी चालणाऱ्या नागरिकांसाठी सुरक्षित जागा उपलब्ध करून देण्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. अनेक ठिकाणी फुटपाथच नसतात, तर काही ठिकाणी फुटपाथवर अतिक्रमणे, अनधिकृत पार्किंग, जाहिरात फलक, बांधकाम साहित्य किंवा इतर अडथळे असतात. परिणामी, नागरिकांना वाहनांच्या गर्दीतून जीव धोक्यात घालून चालावे लागते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने याच मूलभूत प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. रस्ते केवळ मोटार वाहनांसाठी नसून पादचाऱ्यांनाही सुरक्षितपणे चालता आले पाहिजे. स्पष्टपणे निश्चित केलेल्या फुटपाथवरून चालण्याचा अधिकार हा मोटार वाहनांच्या वाहतुकीपेक्षा प्राथमिक असून, वाहनांच्या सोयीसाठी पादचाऱ्यांचा अधिकार नाकारता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. फुटपाथवरून चालण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन झाल्यास नागरिकांना संबंधित जबाबदार यंत्रणांविरुद्ध घटनात्मक आणि कायदेशीर उपायांचा अवलंब करता येईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आवश्यक परिस्थितीत हक्कांचे पुनर्स्थापन आणि नुकसानभरपाई मागण्याचाही मार्ग उपलब्ध होऊ शकतो. हे उपाय मोटार वाहन कायद्याअंतर्गत मिळणाऱ्या उपायांपासून स्वतंत्र असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे फुटपाथचा अभाव, त्यांची दुरवस्था किंवा पादचारी सुविधांकडे दुर्लक्ष यांसारख्या प्रश्नांना आता केवळ प्रशासकीय त्रुटी म्हणून न पाहता नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या दृष्टीनेही तपासण्याचे महत्त्व वाढले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका आणि इतर स्थानिक प्रशासनांनी फुटपाथची उपलब्धता, त्यांची प्रत्यक्ष स्थिती, अतिक्रमणे, अपंगसुलभ सुविधा आणि सुरक्षित पादचारी मार्ग यांचा आढावा घेणे आवश्यक ठरते. मात्र, या निर्णयामुळे पुण्यातील प्रत्येक फुटपाथबाबत स्वतंत्र आदेश दिला गेला आहे, असा त्याचा अर्थ नाही. शहरातील अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासनाची ठोस पावले महत्त्वाची ठरणार आहेत.

पादचाऱ्यांच्या हक्कांना घटनात्मक मान्यता मिळणे हा महत्त्वाचा टप्पा असला, तरी प्रत्यक्ष परिस्थितीत बदल होणे तितकेच आवश्यक आहे. फुटपाथवरून चालताना नागरिकांना वाहनांच्या धोक्याला सामोरे जावे लागत असेल, तर मूलभूत अधिकाराची हमी कागदावरच राहण्याची शक्यता आहे.

फुटपाथचे नियोजन, अतिक्रमणांवर कारवाई, नियमित देखभाल, सुरक्षित पादचारी क्रॉसिंग आणि दिव्यांगांसाठी सुलभ मार्ग या बाबींची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. नागरिकांनीही फुटपाथचा वापर पादचाऱ्यांसाठी सुरक्षित राहील, याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने विकास आणि वाहतूक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी पादचाऱ्यांनाही स्थान देण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. आता या घटनात्मक भूमिकेचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर करून नागरिकांना सुरक्षितपणे चालण्याचा हक्क मिळवून देण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर आहे.

खासगी बसचा प्रवास २०-२५ टक्क्यांनी महागणार

- राजन जुनवणे यांची माहिती
- पुणे बस अँड कार ओनर्स असोसिएशनकडून दरवाढीचा निर्णय



पुणे (दै. आरंभ पर्व)

गाड्यांच्या किंमतीत जवळपास दुपटीने झालेली वाढ, डिझेलसह टायर, बॅटरी, स्पेअर पार्ट्स व अन्य आवश्यक गोष्टींच्या वाढलेल्या किंमती, टोल व करांमध्ये झालेली वाढ यामुळे नाईलाजाने बस आणि कारच्या भाडेदरात २० ते २५ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे बस अँड कार ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजन जुनवणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार भवनात झालेल्या पत्रकार परिषदेवेळी उपाध्यक्ष सुनील मोरे, सचिव तुषार जगताप, खजिनदार दिनेश सोनावणे, किरण देसाई, सचिन पंचमुख आदी उपस्थित होते. शालेय बसवाहतुकीची दरवाढ परिवहन विभागाकडे प्रस्तावित करण्यात आली असून, येत्या शैक्षणिक वर्षांपासून ही नवी दरवाढ लागू होईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. राजन जुनवणे म्हणाले, "प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेली पुणे बस अँड कार ओनर्स असोसिएशन ही पुणे शहरातील एक महत्त्वाची संघटना असून, आमच्या संघटनेचे सुमारे १४०० सभासद आहेत. संघटनेच्या माध्यमातून प्रासंगिक करारावर चालणाऱ्या प्रवासी बसेस, विद्यालय व महाविद्यालयांच्या शैक्षणिक सहली, लग्न समारंभ व धार्मिक यात्रांसाठीच्या बसेस, शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या स्कूल बसेस तसेच पुणे शहर व परिसरातील विविध कंपन्यांच्या कर्मचारी वाहतूक करणाऱ्या स्टाफ बसेस अशा विविध प्रकारच्या प्रवासी वाहतूक सेवांशी संबंधित सभासद कार्यरत आहेत." "मागील पाच वर्षांच्या कालावधीत या बस वाहतूक दरामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. मात्र, या कालावधीत वाहनांच्या किमती, टायर्स, स्पेअर पार्ट्स, देखभाल-दुरुस्ती, चालकांचे वेतन व भत्ते, विमा, इंधन तसेच विविध शासकीय नियम व तांत्रिक बाबींशी संबंधित खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे सध्याच्या दरामध्ये प्रवासी वाहतूक सेवा देणे बस मालकांसाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक झाले असून, दरवाढ करणे आता अपरिहार्य झाले आहे. वाहतूक क्षेत्रालाही महागाईचा मोठा फटका बसत आहे. त्यामुळेच पुणे बस अँड कार ओनर्स असोसिएशनकडून दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या दरवाढीमध्ये प्रामुख्याने १३ सीटर ते ४९ सीटर बस, स्कुल बस, स्टाफ बस व टुरिस्ट बस याचा समावेश आहे," असेही जुनवणे यांनी नमूद केले. किरण देसाई म्हणाले, "याआधीची दरवाढ २०२१ मध्ये करण्यात आली होती. परिवहन मंत्र्यांनी बाकीच्या प्रवासी वाहतुकीला वाऱ्यावर सोडले आहे. फक्त एसटी महामंडळाकडे त्यांचे लक्ष आहे.

प्रस्तावित बस भाडेवाढ

बस/गाडीचा प्रकार - जुना दर नवीन दर
१७ सीटर - २३ रुपये - २७ रुपये
२० सीटर - २५ रुपये - ३० रुपये
३२ सीटर - ३३ रुपये - ३८ रुपये
३५ सीटर - ३६ रुपये - ४२ रुपये
४० सीटर - ४१ रुपये - ४५ रुपये
४५ सीटर - ४५ रुपये - ५५ रुपये
४९ सीटर - ४५ रुपये - ५५ रुपये

खोळंबा : खोदकामामुळे वाहनांच्या रांगा

पुणे (दै. आरंभ पर्व)

गणेशमळा परिसरात महापालिकेने पूर्वसूचना न देता खोदकाम सुरू केल्याने सिंहगड रस्त्यावर शुक्रवारी सकाळपासून प्रचंड वाहतूक कोंडी झाली. धायरीकडून दांडेकर पूल आणि राजाराम पुलाकडे जाणाऱ्या वाहनांच्या लांब रांगा लागल्या. ऐन गर्दीच्या वेळी काम सुरू केल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. सकाळी कामावर जाण्यासाठी बाहेर पडलेल्या नागरिकांना कोंडीचा फटका बसला. वाहनांची गर्दी वाढल्याने मार्गावरील वाहतूक संथ झाली. पुढे जाण्यासाठी वाहनचालकांना प्रतीक्षा करावी लागली. अचानक सुरू झालेल्या खोदकामामुळे प्रवासाचे नियोजन कोलमडल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली. गर्दीच्या वेळा टाळून खोदकाम का केले जात नाही, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला. सिंहगड रस्त्यावर यापूर्वीही अनेकदा अशी परिस्थिती उद्भवली आहे. तरीही कामांचे नियोजन करताना वाहतुकीचा विचार होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे. खोदकामापूर्वी पूर्वसूचना द्यावी आणि वाहतुकीची गर्दी लक्षात घेऊन कामाच्या वेळा ठरवाव्यात, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

पदवीधर, शिक्षक मतदारसंघासाठी आज मतदान

विधान परिषद निवडणूक; पुणे जिल्ह्यातील २३२ मतदान केंद्रांवर पथके रवाना

पुणे (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून, मतदानासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके आवश्यक मतदान साहित्यासह गुरुवारी मतदान केंद्रांकडे रवाना झाली. पुणे जिल्ह्यातील २३२ मतदान केंद्रांवर (शुक्रवार) सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतदानासाठी



नियुक्त पथकांना आज साहित्य वितरण करण्यात आले. मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी मतदान साहित्याची उपलब्धता, कर्मचारी नियुक्ती, वाहतूक आणि केंद्रांवरील पूर्वतयारी यांचे नियोजन करण्यात आले आहे. मतदानानंतर साहित्य सुरक्षितपणे स्वीकारणे आणि निर्धारित ठिकाणी जमा करणे यासाठीही व्यवस्था करण्यात आली असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघांच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १० पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले जाणार आहेत. त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे. छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), केंद्र अथवा राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर खासगी औद्योगिक संस्थांद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना दिलेले सेवा ओळखपत्र, खासदार, आमदार किंवा विधान परिषद सदस्य यांना दिलेली अधिकृत ओळखपत्रे, संबंधित शिक्षक/पदवीधर मतदार संघातील मतदार ज्या शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत आहेत, त्या शैक्षणिक संस्थांनी जारी केलेले सेवा ओळखपत्र, विद्यापीठाद्वारे वितरीत मूळ पदवी/पदविका प्रमाणपत्र, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले शारीरिक दिव्यांगात्वाचे मूळ प्रमाणपत्र आदी पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.



बदलते समाजजीवन आणि हरवलेली माणुसकी!

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...

आजच्या वेगवान युगात माणसाने विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक प्रगतीच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. जग जवळ आले, संपर्काची साधने वाढली, जीवन अधिक सुखकर झाले; मात्र या प्रगतीच्या प्रवासात माणूस माणसापासून दूर जात आहे का, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हातात अत्याधुनिक भ्रमणध्वनी आहे, जगभरातील माहिती एका क्षणात उपलब्ध होते; पण शेजारच्या घरात कोण दुःखी आहे, कोणाला मदतीची गरज आहे, याची विचारपूस करण्यासाठी मात्र वेळ उरलेला नाही. हीच आजच्या बदलत्या समाजजीवनाची सर्वांत मोठी शोकांतिका आहे.

एकेकाळी भारतीय समाजाची ओळख परस्परांवरील विश्वास, आपुलकी, सहकार्य आणि माणुसकी यांमुळे होती. सुख-दुःखात एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे, अडचणीत असलेल्या व्यक्तीला मदतीचा हात देणे आणि समाजातील प्रत्येक घटकाला आपले मानणे, ही आपली संस्कृती होती. आज मात्र वाढती स्पर्धा, आर्थिक चढाओढ, स्वार्थी वृत्ती आणि प्रतिष्ठेच्या दिखाव्याने सामाजिक नात्यांमध्ये अंतर निर्माण केले आहे. माणसाची किंमत त्याच्या स्वभावावरून नव्हे, तर त्याच्याकडे असलेल्या संपत्तीवरून, पदावरून आणि सामाजिक प्रभावावरून ठरवली जाऊ लागली आहे. माणसाकडे पैसा वाढत आहे; पण मनातील संवेदनशीलता कमी होत चालली आहे. ही परिस्थिती केवळ चिंतेची नाही, तर आत्मपरीक्षण करण्याची आहे.

आज समाजात गुन्हेगारी, फसवणूक, कौटुंबिक वाद, महिलांवरील अत्याचार, ज्येष्ठ नागरिकांची उपेक्षा आणि तरुणांमधील वाढता मानसिक ताण अशा अनेक समस्या दिसून येतात. प्रत्येक घटनेमागे एकच कारण असते असे नाही; परंतु बदलती जीवनशैली, सामाजिक दबाव, असमानता, व्यसनाधीनता आणि नैतिक मूल्यांकडे होणारे दुर्लक्ष या घटकांचा विचार करणे आवश्यक आहे. एखादी घटना घडल्यानंतर संताप व्यक्त करणे, समाजमाध्यमांवर प्रतिक्रिया देणे आणि काही दिवसांनी सर्व विसरून जाणे, एवढ्यापुरतीच आपली सामाजिक जबाबदारी मर्यादित राहता कामा नये. कुटुंबव्यवस्थेत झालेले बदलही लक्षात घेण्यासारखे आहेत. एकाच छताखाली राहणाऱ्या व्यक्तींमध्ये संवाद कमी होत आहे. पालकांना मुलांसाठी वेळ नाही, तर मुलांना कुटुंबातील ज्येष्ठांच्या अनुभवांचे महत्त्व समजून घेण्यासाठी पुरेसा संवाद मिळत नाही. वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी टाळणे, नात्यांमध्ये संशय वाढणे आणि छोट्या कारणांवरून संबंध तोडणे या प्रवृत्ती समाजाच्या भावनिक आरोग्यावर परिणाम करतात. आर्थिक प्रगती आवश्यक असली, तरी नात्यांची श्रीमंती गमावून मिळवलेले यश कितपत समाधान देऊ शकते, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.

समाजमाध्यमांनी माणसांना जोडण्याचे काम केले; परंतु त्याच माध्यमांचा वापर अफवा पसरवण्यासाठी, द्वेष निर्माण करण्यासाठी आणि दुसऱ्याची बदनामी करण्यासाठी होत असेल, तर त्याला प्रगती म्हणता येणार नाही. एखादी बातमी सत्य आहे की नाही, याची खातरजमा न करता ती पुढे पाठवली जाते. एखाद्या व्यक्तीच्या अडचणीची थट्टा केली जाते, तर एखाद्या दुर्घटनेचे चित्रण संवेदनशीलतेऐवजी प्रसिद्धीसाठी वापरले जाते. अभिव्यक्तिस्वातंत्र्याबरोबर विवेक, जबाबदारी आणि दुसऱ्याच्या सन्मानाची जाणीव असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

या पार्श्वभूमीवर माध्यमांची जबाबदारी अधिक वाढते. पत्रकारिता ही केवळ घटना सांगणारी व्यवस्था नसून समाजाला दिशा देणारे महत्त्वाचे माध्यम आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, दुर्लक्षित घटकांचे प्रश्न मांडणे, प्रशासनाला जाब विचारणे आणि समाजातील सकारात्मक कार्याला प्रसिद्धी देणे, ही माध्यमांची मूलभूत कर्तव्ये आहेत. सनसनाटीपणा, अपुऱ्या माहितीवर आधारित वृत्तांकन आणि व्यक्तीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणारी वृत्ती टाळून सत्य, समतोल आणि जनहित यांना प्राधान्य दिले पाहिजे. लोकशाही मजबूत करण्यासाठी निर्भीड पत्रकारितेबरोबरच जबाबदार पत्रकारिताही आवश्यक आहे.

मात्र समाज बदलण्याची संपूर्ण जबाबदारी शासन, प्रशासन किंवा माध्यमांवर टाकून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे. रस्त्यावर अपघातग्रस्त व्यक्ती दिसल्यास शक्य ती मदत करणे, महिलांचा आणि ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान राखणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता पाळणे, अफवांवर विश्वास न ठेवणे, अन्याय दिसल्यास कायदेशीर मार्गाने आवाज उठवणे आणि गरजू व्यक्तीच्या मदतीसाठी पुढे येणे, या छोट्या कृती समाजात मोठा बदल घडवू शकतात.

शाळांमधून केवळ गुणांची स्पर्धा नव्हे, तर संवेदनशीलता, प्रामाणिकपणा, सहिष्णुता आणि सामाजिक बांधिलकी यांचेही शिक्षण दिले पाहिजे. पालकांनी मुलांसमोर स्वतःच्या वर्तनातून आदर्श ठेवला पाहिजे. स्थानिक संस्था, सामाजिक संघटना आणि लोकप्रतिनिधींनी समाजातील दुर्बल घटकांसाठी प्रत्यक्ष काम केले पाहिजे. कायद्याची भीती निर्माण करणे जितके आवश्यक आहे, तितकेच योग्य संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करणेही गरजेचे आहे.

आज समाजाला केवळ मोठे रस्ते, उंच इमारती, आधुनिक सुविधा आणि आर्थिक विकास नको आहे; तर सुरक्षित वातावरण, विश्वासाची नाती, समान संधी आणि संवेदनशील माणसेही हवी आहेत. विकासाची खरी कसोटी केवळ देशाच्या संपत्तीत नसते, तर त्या देशातील सामान्य माणसाचे जीवन किती सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि आनंदी आहे, यात असते. माणुसकी ही भाषणांतून जिवंत राहत नाही; ती कृतीतून जिवंत राहते. दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव होणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे आणि स्वतःच्या फायद्यापलीकडे जाऊन समाजाचा विचार करणे, यातच खऱ्या माणुसकीचे दर्शन घडते. आज गरज आहे ती केवळ समाज बदलण्याची अपेक्षा करण्याची नाही, तर स्वतःमध्ये बदल घडवण्याची. कारण समाज हा वेगळा घटक नसून आपल्याच विचारांचा, कृतींचा आणि संस्कारांचा आरसा आहे. प्रत्येकाने माणुसकीचा एक दिवा पेटवला, तर समाजातील अंधार निश्चितच कमी होऊ शकतो. प्रगतीच्या शर्यतीत आपण किती पुढे गेलो, यापेक्षा या प्रवासात किती माणसे जोडली, किती दुःखी चेहऱ्यांवर हास्य फुलवले आणि किती गरजूंना आधार दिला, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. शेवटी माणसाची खरी ओळख त्याच्या संपत्तीने किंवा पदाने होत नाही; ती त्याच्या माणुसकीने होते. समाजाचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल, तर विकासाबरोबर संवेदनशीलतेची आणि यशाबरोबर माणुसकीचीही जपणूक करावी लागेल. कारण माणुसकी हरवलेला समाज कितीही प्रगत झाला, तरी तो खऱ्या अर्थाने समृद्ध होऊ शकत नाही.


स्मार्ट सिटीसाठी अखंडित वीजपुरवठा, स्मार्ट पार्किंग गरजेचे – नरेंद्र गोयल

पुणे (दै. आरंभ पर्व)

झपाट्याने वाढणारे शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि आधुनिक जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर स्मार्ट सिटीच्या उभारणीसाठी अखंडित वीजपुरवठा, अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि स्मार्ट पार्किंग व्यवस्था अत्यावश्यक बनली आहे. शहरांचा विकास केवळ रस्ते आणि इमारतींपुरता मर्यादित न राहता, नागरिकांना अधिक सुरक्षित, सुलभ आणि कार्यक्षम सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या तंत्रज्ञानाधारित व्यवस्थांवरही भर देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन श्याम ग्लोबल टेक्नोव्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि इंटेलिपार्किंग सिस्टिम्सचे संचालक नरेंद्र गोयल यांनी केले. पुणे अग्रवाल समाजाच्या वतीने डेक्कन कॉलेज मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या *'प्रवाह बिझनेस एक्स्पो'*च्या निमित्ताने ते बोलत होते. या प्रदर्शनात महिंद्रा पॉवरॉल जनरेटर आणि इंटेलिपार्किंग सिस्टिम्सच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या आधुनिक सुविधा व तंत्रज्ञानाचे सादरीकरण करण्यात आले. या तंत्रज्ञानाला उद्योजक आणि व्यावसायिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. नरेंद्र गोयल म्हणाले की, आजच्या काळात रुग्णालये, हॉटेल्स, शॉपिंग मॉल्स, औद्योगिक आस्थापना, व्यावसायिक संकुले आणि निवासी प्रकल्पांसाठी अखंडित वीजपुरवठा अत्यंत महत्त्वाचा आहे. वीजपुरवठ्यातील व्यत्ययामुळे कामकाजावर परिणाम होऊ नये, यासाठी विश्वासार्ह जनरेटर व्यवस्था आवश्यक ठरते. या दृष्टीने महिंद्रा पॉवरॉल जनरेटर विविध क्षेत्रांसाठी उपयुक्त पर्याय ठरतात. त्याचप्रमाणे, वाढत्या वाहनसंख्येमुळे शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या पार्किंगच्या समस्येवर उपाय म्हणून इंटेलिपार्किंग सिस्टिम्सचे आधुनिक पार्किंग तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरू शकते. मर्यादित जागेचा अधिक कार्यक्षम वापर करून पार्किंग व्यवस्थापन सुलभ करणे, वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत करणे आणि शहरी पायाभूत सुविधांचा योग्य वापर करणे ही काळाची गरज आहे. स्मार्ट सिटीच्या विकासात अशा आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. देशांतर्गत बाजारपेठेतील वाढत्या संधींचा लाभ घेण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही विस्तार करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी निर्यातीच्या संधींचा शोध घेणे, व्यवसायाचा विस्तार करणे आणि बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढविणे यावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. जनरेटर निर्मिती क्षेत्रातील देशातील आघाडीच्या दहा कंपन्यांमध्ये स्थान मिळविण्याच्या दिशेने कंपनीची वाटचाल सुरू असल्याचा विश्वासही यामिनी गोयल यांनी व्यक्त केला.

'प्रवाह बिझनेस एक्स्पो'सारखी व्यासपीठे उद्योजक, व्यावसायिक, गुंतवणूकदार आणि ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्याबरोबरच नव्या व्यावसायिक संधी निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरतात.





कंपनीच्या विस्तारासह निर्यातीवरही लक्ष

यामिनी गोयल यांनी कंपनीच्या भविष्यातील विस्तार योजनांची माहिती दिली. त्या म्हणाल्या की, श्याम ग्लोबल टेक्नोव्हेंचर्स जनरेटर निर्मिती आणि ऊर्जा उपाययोजनांच्या क्षेत्रात आपली व्यावसायिक व्याप्ती वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. पुणे, मुंबई, नाशिक, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर यांसह महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये कंपनीची उपस्थिती अधिक मजबूत करण्यावर भर दिला जात आहे.

नेक्सस वेस्टएंड आणि द पॅव्हिलियन मॉलमध्ये सांस्कृतिक उत्सवाची पर्वणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

सणासुदीच्या काळात पुण्यातील नेक्सस वेस्टएंड आणि द पॅव्हिलियन मॉलमध्ये भारतीय संस्कृती, कला आणि परंपरांचा अनोखा अनुभव पुणेकरांना घेता येणार आहे. रामायणावर आधारित सजावट, वारली कला, कथाकथन, कला स्पर्धा आणि पारंपरिक नृत्य सादरीकरण अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नेक्सस वेस्टएंड मॉलमध्ये रामायण या महाकाव्यावर आधारित आकर्षक उत्सवी सजावट करण्यात आली आहे. जलाशयाच्या पार्श्वभूमीवर



उभारलेला भव्य मंडप, त्याकडे जाणारा पूल तसेच रामसेतू आणि अशोकवाटिका यांसारख्या प्रसंगांचे सादरीकरण हे या सजावटीचे प्रमुख आकर्षण आहे. ३१ ऑक्टोबर रोजी मुलांसह प्रौढांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा आणि रामकथा सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. एक नोव्हेंबर रोजी कला स्पर्धा होणार आहे.

दरम्यान, द पॅव्हिलियन मॉलमध्ये 'वारली दिवाळी' या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या पारंपरिक वारली कलेचे आधुनिक रूप सादर करण्यात आले आहे. १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरदरम्यान आयोजित या उपक्रमात वारली कलेपासून प्रेरित कलात्मक स्थापना, इन्फिनिटी रूम, छायाचित्रांसाठी विशेष कमान आणि प्रकाशमान वारली कंदील यांचा समावेश आहे.

१७ ऑक्टोबरपासून सलग चार आठवड्यांच्या अखेरीस वारली कला कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, ३१ ऑक्टोबर आणि एक नोव्हेंबर रोजी होणारे पारंपरिक तारपा नृत्य सादरीकरण उत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. या उपक्रमांद्वारे भारतीय सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासोबतच कुटुंबीय आणि मित्रपरिवाराला एकत्र येऊन सण साजरा करण्याची संधी मिळणार आहे. दोन्ही मॉलमधील सर्व उपक्रमांसाठी प्रवेश विनामूल्य आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



अलदरेला एकत्र मिरवणुकीने नवरात्र उत्सवाची सांगता

जुन्नर (आरंभ पर्व) : अलदरे ता.जुन्नर येथील त्रिमूर्ती युवा मंच व भैरवनाथ नवरात्र उत्सव मंडळांनी विजयादशमीला देवीची एकत्र मिरवणूक काढून नवरात्र उत्सवाची सांगता केली. गावातील दोनही मंडळांनी एकत्र मिरवणूक काढल्याने गावात एक आनंददायी आणि अभिमानास्पद सोहळा संपन्न झाला. नवरात्रोत्सवात गावातील त्रिमूर्ती युवा मंच व भैरवनाथ नवरात्र उत्सव मंडळ या दोन प्रमुख मंडळांकडून देवींची स्थापना करण्यात येते. यावर्षी एकत्र मिरवणूक काढल्याने हा सोहळा गावातील सामाजिक एकतेचे मूर्तिमंत आणि प्रेरक उदाहरण ठरले. याचबरोबर एकतेचा संदेश दिला गेला. जात, धर्म आणि सर्व भेदाभेद विसरून संपूर्ण गावाने एकत्र येऊन हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. दोन मंडळांनी हातात हात घालून घेतलेला हा निर्णय गावकऱ्यांमध्ये सलोखा, प्रेम आणि बंधुभाव अधिक दृढ करणारा ठरला. या मिरवणुकीत तरुण वर्ग, माता-भगिनी आणि बाळचमू यांनी प्रचंड संख्येने सहभाग घेतला. पारंपारिक वाद्यांच्या तालावर, गुलालाची उधळण करत उत्सवाचा जल्लोष साजरा झाला. देवीच्या जय घोषात गाव दुमदमून गेले. यासाठी त्रिमूर्ती युवा मंचचे संकेत दप्तरे, कमलेश दप्तरे, सागर दप्तरे, प्रसाद दप्तरे, मंगेश दप्तरे, प्रियंका दप्तरे तसेच श्री भैरवनाथ नवरात्र मंडळाचे अनिल घोगरे, विशाल घोगरे, नामदेव घोगरे, गणेश काळे, दशरथ घोगरे, बाळू घोगरे यांनी विशेष सहकार्य केले.

L&T Finance

एल अँड टी फायनान्सचा दुसऱ्या तिमाहीत ९७५ कोटींचा विक्रमी नफा

मुंबई (आरंभ पर्व) : एल अँड टी फायनान्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीने ९७५ कोटी रुपयांचा विक्रमी एकत्रित करपश्चात नफा नोंदवला असून, मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात ३३ टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनीचा एकत्रित कर्ज पोर्टफोलिओ २८ टक्क्यांनी वाढून १,३६,६३५ कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. कंपनीच्या किरकोळ कर्ज व्यवसायातही लक्षणीय वाढ झाली आहे. किरकोळ कर्ज पोर्टफोलिओ २९ टक्क्यांनी वाढून १,३४,६०० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. तसेच, तिमाहीतील किरकोळ कर्जवितरणात २७ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली असून, या कालावधीत एकूण २४,०२७ कोटी रुपयांचे कर्जवितरण करण्यात आले. मालमत्तेच्या गुणवत्तेत झालेली सुधारणा, कर्जावरील खर्चात झालेली घट आणि मालमत्तेवरील परताव्यात झालेली वाढ यांमुळे कंपनीच्या नफ्यात सुधारणा झाल्याचे स्पष्ट होते.

नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची स्केटिंगमध्ये भरारी

चार विद्यार्थ्यांना कांस्यपदक; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



पुणे (दै. आरंभ पर्व)

स्केटिंगच्या मैदानावर वेग, कौशल्य आणि जिद्दीची चुणूक दाखवत नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी रोलर ॲथलेटिक्स पुणे स्केटिंग चॅम्पियनशिप २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत शाळेच्या चार विद्यार्थ्यांनी कांस्यपदक पटकावले असून, त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्रीय मंडळ स्केटिंग रिंक येथे झालेल्या या स्पर्धेत शिवान्या गुरव हिने नऊ वर्षांखालील गटात क्वाड्स प्रकारातील लाँग आणि शॉर्ट डिस्टन्समध्ये कांस्यपदके मिळवली. सुयोग पाटकर याने तेरा वर्षांखालील गटात दोन्ही प्रकारांत कांस्यपदके पटकावली. शौर्य जाधव याने बारा वर्षांखालील गटात शॉर्ट डिस्टन्समध्ये, तर साई हनकुने याने दहा वर्षांखालील गटात लाँग डिस्टन्समध्ये कांस्यपदक मिळवले. या कामगिरीच्या जोरावर या चारही विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डिसेंबरमध्ये खोपोली, रायगड येथे ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत सुयोग पाटील, स्वानंद पाटकर, अरमान जमादार आणि आर्या कुचेकर यांनीही सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेच्या संस्थापिका सुनीता डांगे, संचालक राजाराम डांगे आणि मुख्याध्यापिका प्रियांका चोतलिया यांनी अभिनंदन केले. तसेच आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

राज्यस्तरीय स्पर्धेकडे लक्ष

पुणे शहरातील स्पर्धेत पदकांची कमाई केल्यानंतर नूतन इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी आता राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली आहे.

दसऱ्याच्या परंपरेला पर्यावरण संवर्धनाची जोड!

पुणे (दै. आरंभ पर्व)

दसऱ्याच्या सणानिमित्त आपट्याची पाने वाटून सोनं लुटण्याची परंपरा जपत नागरिकांना आपट्याची आणि तुळशीची रोपे देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. श्री स्वामी बॅग्ज आणि नगरसेवक ॲड .प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. दसऱ्याला आपट्याची पाने एकमेकांना देऊन शुभेच्छा देण्याची परंपरा आहे. मात्र, या परंपरेसोबतच झाडांचे महत्त्व नागरिकांना समजावे आणि वृक्षसंवर्धनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने आपट्याची व तुळशीची रोपे वाटण्यात आली. सणाच्या आनंदासोबत निसर्ग



जपण्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. केवळ सणापुरती पाने वाटण्याऐवजी झाडे लावून ती जगवण्याचा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला.

यावेळी श्री स्वामी बॅग्जचे राहुल जगताप, प्रणोती जगताप, प्रणव जगताप, वेद पांचाळ, मनोज उत्तेकर, नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप, सामाजिक कार्यकर्ते नाना राऊत, भास्कर आंब्रे, भाऊसाहेब निकम आदी उपस्थित होते.

मेडिकल कोडिंग परीक्षेत सागर कांबळे, स्नेहा गायकवाड यांचे घवघवीत यश!





पुणे (दै. आरंभ पर्व)

मेडिकल कोडिंग क्षेत्रातील महत्त्वाची परीक्षा उत्तीर्ण होत सागर तानाजी कांबळे आणि स्नेहा गायकवाड यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शिवाजीनगर, पुणे येथील साई इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल कोडिंग येथे झालेल्या परीक्षेत सागर कांबळे यांनी ८० टक्के, तर स्नेहा गायकवाड यांनी ८३ टक्के गुण मिळवले. या यशाबद्दल दोघांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

स्नेहा गायकवाड यांनी यापूर्वी एम. फार्म. ही पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली आहे. त्यानंतर मेडिकल कोडिंग परीक्षेतही त्यांनी विशेष प्रावीण्य मिळवत आपल्या शैक्षणिक यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. मेडिकल क्षेत्रात मेडिकल कोडिंगला महत्त्व प्राप्त होत असताना दोघांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. त्यांच्या या यशाबद्दल सिंहगड रोड परिसरातील मित्रमंडळी, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक आणि परिवारातील सदस्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



पोलिसांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

सामाजिक कार्यकर्ते दीपक चौघुले यांचा पुढाकार; पोलीस अधिकाऱ्यांकडून उपक्रमाचे कौतुक

पुणे (दै. आरंभ पर्व)

वाढदिवसाचा आनंद सामाजिक उपक्रमातून साजरा करत सामाजिक कार्यकर्ते दीपक हरिभाऊ चौघुले यांनी पोलिसांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त स्वारगेट पोलीस स्टेशन आणि स्वारगेट वाहतूक पोलीस स्टेशनमधील अधिकारी, कर्मचारी तसेच वाहतूक पोलिसांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सारथी रुग्णहक्क जनसेवा ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. या शिबिरात रक्तदाब, रक्तातील साखर, ईसीजी, हाडांची तपासणी, डोळ्यांची तपासणी, उंची, वजन तसेच फिजिओथेरपी अशा विविध आरोग्यविषयक तपासण्या मोफत करण्यात आल्या. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी दिवसभर नागरिकांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असतात. वाहतूक पोलिसांना रस्त्यावर उभे राहून कर्तव्य बजावावे लागते. कामाच्या व्यस्त वेळापत्रकामुळे अनेकदा आरोग्याकडे दुर्लक्ष होते. ही बाब लक्षात घेऊन पोलिसांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. दीपक चौघुले हे दरवर्षी हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सामाजिक कार्यातून मदत करतात. तसेच अडचणीच्या वेळी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही सहकार्य करतात. त्यांच्या सामाजिक कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी परिमंडळ दोनचे सहाय्यक पोलीस आयुक्त मिलिंद मोहिते, सिंहगड रोड विभागाचे सहाय्यक पोलीस उपायुक्त विजय कुंभार आणि स्वारगेट पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस अधिकारी यशवंत निकम यांनी उपस्थित राहून दीपक चौघुले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. पीएमपीएमएलचे संचालक व नगरसेवक अजय खेडेकर यांनीही त्यांची भेट घेतली. या शिबिरासाठी सिल्वर बर्च हॉस्पिटल आणि भारती विद्यापीठ फिजिओथेरपी कॉलेजचे सहकार्य लाभले. सारथी रुग्णहक्क जनसेवा ट्रस्टच्या टीमने आयोजनासाठी परिश्रम घेतले. वाढदिवसाच्या निमित्ताने पोलिसांच्या आरोग्याची काळजी घेणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकी जपणारा ठरला.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



भाईचारा समाज संघातर्फे अखंड रामायण पाठ; रुग्णवाहिकेचे लोकार्पण

पुणे (आरंभ पर्व) : भाईचारा समाज संघ (उत्तर भारतीय) यांच्या वतीने वार्षिक उत्सवानिमित्त आयोजित श्री रामचरितमानस अखंड रामायण पाठ सोहळा १९ व २० ऑक्टोबर रोजी मंगळवार पेठ, पुणे येथे भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी रामायण पूजन, अखंड रामायण पाठाची सांगता, हवन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते प्राणव दादा चौधरी यांच्या शुभहस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थापक राजेंद्र पटेल यांच्यासह संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. धार्मिक परंपरेसोबत सामाजिक सेवेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

दसऱ्यानिमित्त आपट्याच्या व तुळशीच्या रोपांचे वाटप

पुणे (आरंभ पर्व) : विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या शुभमुहूर्ताचे औचित्य साधून श्री स्वामी बॅग्ज, पुणे आणि सिंहगड रोडवरील प्रतिष्ठित जनजागृती मित्र मंडळ ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांना आपट्याच्या पानांचे (सोने) तसेच,आपट्याच्या व तुळशीच्या रोपांचे वाटप करण्यात आले. दसरा हा सण विजय, समृद्धी आणि शुभारंभाचे प्रतीक मानला जातो. या सणाच्या निमित्ताने पारंपरिक आपट्याच्या पानांचे वाटप करण्यासोबतच नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि निसर्गाप्रती जाणीव निर्माण व्हावी, या सामाजिक भावनेतून तुळशीच्या रोपांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भारतीय संस्कृतीतील परंपरा जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. यावेळी श्री स्वामी बॅग्जचे श्री. राहुल जगताप, श्री. मनोज उत्तेकर तसेच जागृती मित्र मंडळ ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्री. विनायक बापू निंबाळकर - श्री अशोक वेल्हाळ - श्री भगवान शेठ साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते. परंपरा आणि पर्यावरण यांची सांगड घालत सणांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा हा उपक्रम परिसरात सकारात्मक संदेश देणारा ठरला.

माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांना जीवनगौरव पुरस्कार

पुणे (आरंभ पर्व) : शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य संस्था म्हणून ओळख असलेल्या नऱ्हे मानाजीनगर येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् च्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचा जीवनगौरव पुरस्कार माजी खासदार, समाजसेवक प्रा. जोगेंद्र कवाडे यांना शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल १, मानाजीनगर, नऱ्हे येथे होणा-या कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली. सन्मान सोहळ्यांतर्गत पद्मश्री राहीबाई पोपेरे यांना कृषी क्षेत्रातील पुरस्कार, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे चे अध्यक्ष औदुंबर उकिरडे यांना शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार, सिने अभिनेता मिलिंद शिंदे यांना कला क्षेत्रातील पुरस्कार, पुणे अर्बन को-ऑप बँकेचे अध्यक्ष निलेश ढमढेरे यांना सहकार क्षेत्रातील पुरस्कार आणि समाज प्रबोधन चॅरिटेबल ट्रस्टचे जयंत हिरे यांना सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल असे पुरस्कारांचे स्वरुप आहे. ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, दरवर्षी शैक्षणिक, सामाजिक, सहकार, कला यांसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तिंना पुरस्काराने गौरविण्यात येते. यावर्षी कार्यक्रमाला ज्येष्ठ संपादक विजय बाविस्कर हे अध्यक्षस्थानी असणार आहेत. तसेच संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ.सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी डीपीजीयूचा पहिला दीक्षांत समारंभ २९ ऑक्टोबरला

पुणे (आरंभ पर्व) : ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (डीपीजीयू)चा पहिला दीक्षांत समारंभ तसेच विद्यापीठातील नव्याने उभारण्यात आलेल्या शैक्षणिक सुविधांचे उद्घाटन गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ताथवडे येथील डीपीजीयू स्कूल ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, सर्व्हे क्रमांक १३८, जीवननगर कॅम्पस येथे होणार आहे. महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील हे या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते विद्यापीठाच्या नव्या शैक्षणिक सुविधांचे औपचारिक उद्घाटन करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे सदस्य तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे (एसपीपीयू) सदस्य मा. श्री. राजेश पांडे हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील. लोकमत मीडिया प्रा. लि., पुणेचे ग्रुप एडिटर श्री. विजय बाविस्कर यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदान आणि कार्याची दखल घेत विद्यापीठातर्फे मानद 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' (डी.लिट.) ही पदवी प्रदान करण्यात येणार आहे. दीक्षांत समारंभाची सुरुवात मान्यवरांच्या आगमनाने आणि छायाचित्रणानंतर होणाऱ्या औपचारिक मिरवणुकीने होईल. त्यानंतर वंदे मातरम्, दीपप्रज्वलन आणि दीक्षांत समारंभाच्या उद्घोषणेचा कार्यक्रम होईल. कुलगुरू स्वागतपर भाषण करून विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर करतील.

प्रोजेक्ट स्कूल संसद २०२६-२७ साठी नोंदणी सुरू

पुणे (आरंभ पर्व) : दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्टच्या 'स्कूल संसद' या अनोख्या शैक्षणिक उपक्रमाच्या २०२६-२७ च्या आवृत्तीची घोषणा करण्यात आली असून डिसेंबर २०२६ मध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रादेशिक प्राथमिक फेऱ्यांनी सुरू होईल.या स्पर्धेतून सर्वोत्तम १५० विद्यार्थी प्रतिनिधींची निवड केली जाईल. गेल्या १३ वर्षांपासून, हा प्रकल्प इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांना लोकशाही आणि संसदीय प्रणालीचा थेट व व्यावहारिक अनुभव देत आहे. आजच्या काळात, एकीकडे राजकारण आणि प्रशासनाविषयी सर्वसामान्यांच्या मनात नकारात्मकता पसरली आहे, तर दुसरीकडे शाळांमधील नागरिकशास्त्र केवळ पाठ्यपुस्तकातील सिद्धांतापुरतेच मर्यादित राहिले आहे. ही मोठी दरी सांधण्यासाठी, 'स्कूल संसद' विद्यार्थ्यांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देते, जिथे विद्यार्थी स्वतः कायदेकर्ते (खासदार/आमदार) बनून सामाजिक प्रश्नांवर चर्चा करतात आणि धोरणनिर्मितीची प्रक्रिया समजून घेतात. ही एक वक्तृत्व स्पर्धा नसून, आपल्या संविधानातील 'न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' या मूल्यांचे जतन करण्यासाठी समर्पित असलेली एक चळवळ आहे.

चेन्नईत ९ ते ११ डिसेंबरदरम्यान दहावे युनिफॉर्म मॅन्युफॅक्चरर्स फेअर २०२६

१५० हून अधिक ब्रँड्स, २५ हजारांहून अधिक गणवेशांच्या डिझाईन्ससह टॉवेल, चादरी आणि नॅपकिन्सची भव्य मांदियाळी

चेन्नई (दै. आरंभ पर्व)

सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या (एसजीएमए) वतीने दहाव्या 'युनिफॉर्म मॅन्युफॅक्चरर्स फेअर २०२६'चे आयोजन ९ ते ११ डिसेंबरदरम्यान चेन्नईतील नंदंबक्कम येथील चेन्नई ट्रेड सेंटरमध्ये करण्यात आले आहे. देशभरातील गणवेश आणि टॉवेल उत्पादकांना एकाच व्यासपीठावर आणणारे हे तीन दिवसीय व्यावसायिक प्रदर्शन उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



Shri Ashok Chavan
Fair Chairman, SGMA



Shri Aniket Mahindrakar
Fair Secretary, SGMA

या प्रदर्शनात देशभरातील १५० हून अधिक नामांकित ब्रँड्स सहभागी होणार असून, २५ हजारांहून अधिक गणवेश, कापड आणि संबंधित साहित्याच्या विविध डिझाईन्सचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. याशिवाय टॉवेल, चादरी आणि नॅपकिन्सच्या विविध प्रकारांनाही विशेष स्थान देण्यात येणार आहे. शिक्षण, आरोग्य, आदरातिथ्य, औद्योगिक आणि कॉर्पोरेट क्षेत्रांमध्ये गणवेशांची मागणी सातत्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर उत्पादक, वितरक, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि कॉर्पोरेट खरेदीदार यांना थेट व्यावसायिक संपर्क प्रस्थापित करण्याची संधी या प्रदर्शनातून उपलब्ध होणार आहे. प्रदर्शनात शालेय, महाविद्यालयीन, क्रीडा, औद्योगिक, कॉर्पोरेट आणि रुग्णालयीन गणवेशांसह हिवाळी कपडे, ब्लेझर्स, गणवेशासाठीचे कापड, पट्टे, टाय, बोधचिन्ह छपाई साहित्य, बूट, मोजे आणि शालेय दप्तरांची विविधता पाहायला मिळणार आहे. यंदाच्या प्रदर्शनात 'व्हायब्रंट टॉवेल' या उपक्रमांतर्गत टॉवेल उत्पादकांचाही विशेष सहभाग असेल. आंघोळीचे टॉवेल, भेटवस्तू संच, जलतरण तलावांसाठीचे टॉवेल, स्वयंपाकघरातील टॉवेल, समुद्रकिनाऱ्यावरील वापरासाठीचे टॉवेल, स्नानवस्त्रे, चादरी आणि प्रसिद्ध सोलापुरी चादरी यांची विस्तृत श्रेणी येथे उपलब्ध होणार आहे. एसजीएमएचे प्रदर्शन समितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण म्हणाले, "२०१७ मध्ये पहिल्या प्रदर्शनापासून आम्ही गणवेश उत्पादन क्षेत्र अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. दहाव्या प्रदर्शनाच्या माध्यमातून तयार कपडे, कापड, विविध साहित्य आणि पादत्राणे यांसह संपूर्ण उत्पादन साखळी एकाच व्यासपीठावर आणली जात आहे. भारतीय उत्पादकांना देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक बनवणे हा आमचा मुख्य उद्देश आहे." एसजीएमएचे प्रदर्शन समितीचे सचिव अनिकेत महिंद्रकर यांनी सांगितले की, गणवेश उद्योगात रचना, कापड, तंत्रज्ञान आणि विपणन क्षेत्रांत वेगाने बदल होत आहेत. या प्रदर्शनामुळे उद्योजकांना नवीन व्यावसायिक प्रवाह समजून घेण्यासह प्रस्थापित आणि नवोदित उत्पादकांशी संपर्क साधता येणार आहे. वितरक, विक्रेते, शाळा, रुग्णालये, कंपन्या आणि नवउद्योजकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. सोलापूरचे गणवेश आणि टॉवेल उत्पादन क्षेत्र देशाच्या वस्त्रोद्योगात महत्त्वाचे योगदान देत आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन, वेळेत मालाचा पुरवठा आणि कमी प्रमाणातील तसेच पुनरावृत्तीच्या मागण्या पूर्ण करण्याची क्षमता यांमुळे सोलापूरच्या उत्पादकांनी देशभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०१७ मध्ये सोलापूरमधून सुरू झालेल्या या प्रदर्शनाचा विस्तार बंगळुरू, मुंबई, हैदराबाद आणि वाराणसी यांसारख्या प्रमुख शहरांपर्यंत झाला आहे. या उपक्रमाने आतापर्यंत ३०० हून अधिक उद्योजकांना व्यवसायवाढीसाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमाला चालना देणे, देशांतर्गत पुरवठा साखळी मजबूत करणे आणि भारतीय उत्पादकांसाठी जागतिक बाजारपेठेत नव्या संधी निर्माण करणे, ही या प्रदर्शनामागील प्रमुख उद्दिष्टे आहेत.

प्रदर्शनाची माहिती

- प्रदर्शनाचे नाव : दहावे युनिफॉर्म मॅन्युफॅक्चरर्स फेअर २०२६
- दिनांक : ९ ते ११ डिसेंबर २०२६
- स्थळ : चेन्नई ट्रेड सेंटर, सभागृह क्रमांक ४, नंदंबक्कम, चेन्नई, तामिळनाडू – ६०००८९
- आयोजक : सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (एसजीएमए)
- संकेतस्थळ : www.sgma.in
- संपर्क क्रमांक : +९१-८००१९००११२

'हर घर धुरंधर'! रणवीर सिंहचा 'धुरंधर' चित्रपट २५ ऑक्टोबरला प्रथमच फ्रीडिशवर

अकोला (दै. आरंभ पर्व)

अभिनेता रणवीर सिंह याच्या प्रमुख भूमिकेतील 'धुरंधर' हा गाजलेला स्पाय थ्रिलर चित्रपट आता देशभरातील प्रेक्षकांना घरबसल्या पाहता येणार आहे. 'हर घर धुरंधर' या विशेष उपक्रमांतर्गत हा चित्रपट रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता प्रथमच फ्रीडिश प्रेक्षकांसाठी प्रदर्शित होणार आहे. स्टार उत्सव मूव्हीज, कलर्स सिनेप्लेक्स बॉलिवूड आणि कलर्स सिनेप्लेक्स सुपरहिट्स या तीन वाहिन्यांवर एकाच वेळी चित्रपटाचा प्रीमियर होणार आहे. दहा कोटींहून अधिक घरांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा असलेल्या या उपक्रमामुळे महानगरांपासून ते छोट्या शहरांपर्यंत आणि ग्रामीण भागांतील प्रेक्षकांनाही या चित्रपटाचा आनंद घेता येणार आहे. देशासाठी पडद्यामागे राहून गुप्तपणे कार्य करणाऱ्या अज्ञात वीरांना समर्पित असलेल्या या चित्रपटात ॲक्शन, थरार आणि उत्कंठावर्धक प्रसंगांची मेजवानी आहे. रणवीर सिंह एका दमदार भूमिकेत दिसत असून, त्याच्यासोबत अक्षय खन्ना, संजय दत्त, आर. माधवन, अर्जुन रामपाल, राकेश बेदी आणि सारा अर्जुन यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. आदित्य धर यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाला त्यातील भव्य ॲक्शन दृश्ये, प्रभावी संवाद आणि कलाकारांच्या अभिनयासाठी प्रेक्षकांची पसंती मिळाली आहे.



नवले प्राथमिक शाळेत विविध उपक्रम उत्साहात

वाचन प्रेरणा दिन, भोंडला, सैनिकांना शुभेच्छापत्रे; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

पुणे (दै. आरंभ पर्व)

वडगाव खुर्द येथील कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळा, मनपा शाळा क्रमांक ५६ ब मध्ये नुकतेच विविध उपक्रम उत्साहात पार पडले. वाचन प्रेरणा दिन, भोंडला, सैनिकांसाठी शुभेच्छापत्रे तयार करणे, तसेच महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, हा या उपक्रमामागील उद्देश होता. रेश्मा नवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नवरात्रोत्सवानिमित्त शाळेत भोंडल्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी दांडियामध्ये सहभागी होत आनंद लुटला. शाळेतील वातावरण उत्साहाने भरून गेले होते. या उपक्रमासाठी शिल्पा धूके यांनी मार्गदर्शन केले. दिवाळीनिमित्त इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सैनिक बांधवांसाठी स्वतःच्या हाताने शुभेच्छापत्रे तयार केली. सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी विद्यार्थ्यांनी हा उपक्रम राबविला. ही शुभेच्छापत्रे आधार सोशल ट्रस्टच्या विजया माने यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. प्रियांका देवकुळे यांनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन केले. महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांनी भाषणातून दिली. त्यांच्या जीवनातील प्रसंग सांगत विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या विचारांची ओळख करून दिली. विजय कदम यांनी या उपक्रमासाठी मार्गदर्शन केले. शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुमन गंथडे, स्वाती पडवळ, संध्या चांदगुडे, अनिता शितोळे, गणेश पतंगे, आशा नवगिरे यांच्यासह सर्व शिक्षकांनी उपक्रमात सहभाग घेतला. अभ्यासाबरोबरच संस्कार, संस्कृती आणि देशप्रेमाची शिकवण देणारे हे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी ठरले.



पॅकेज्ड आणि फ्रोझन फूड्स खरेदी करताना ग्राहकांनी कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात?

पुणे (दै. आरंभ पर्व)

आरोग्यदायी आहाराबाबत वाढती जागरूकता आणि धावपळीची जीवनशैली यांमुळे पॅकेज्ड आणि फ्रोझन फूड्सचा वापर वाढत आहे. मात्र, अशी उत्पादने खरेदी करताना केवळ पॅकेटच्या दर्शनी भागावरील आकर्षक माहितीवर अवलंबून न राहता त्यावरील घटक, पोषणमूल्ये, साठवणुकीच्या सूचना आणि प्रक्रिया पद्धती समजून घेणे आवश्यक आहे. आज ग्राहक दैनंदिन आहारात प्रथिनयुक्त आणि आरोग्याच्या दृष्टीने योग्य पर्यायांचा समावेश करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे उत्पादनाच्या पॅकेटवरील माहितीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



घटकांची यादी, प्रथिनांचे प्रमाण, प्रत्येक सेवनामागील प्रमाण आणि साठवणुकीच्या सूचना तपासल्यास ग्राहकांना आपल्या गरजेनुसार अधिक माहितीपूर्ण निर्णय घेता येतो. पॅकेज्ड आणि फ्रोझन फूड्सच्या बाबतीत ही माहिती विशेष महत्त्वाची ठरते.

- या लेखाचे श्रेय डॉ. मनिका सिंग, न्यूट्रिशनल कन्सल्टंट, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुप आणि हेल्थ कम्युनिकेशन्स ॲडव्हायझरी - गोदरेज फूड्स लिमिटेड व गोदरेज जर्सी यांना

उत्पादनातील पोषणमूल्ये आणि ते तयार करण्यासाठी वापरलेल्या प्रक्रियेची माहिती समजून घेतल्यास त्याचा दैनंदिन आहारात योग्य प्रकारे समावेश करता येऊ शकतो. गोदरेज यमीजच्या एसटीएम २.० अहवालानुसार, भारतातील ८७ टक्के व्यक्तींना आयक्यूएफ या संज्ञेचा अर्थ माहीत नाही. आयक्यूएफ म्हणजे 'इंडिव्हिज्युअली क्विक फ्रोझन' अर्थात प्रत्येक घटक स्वतंत्रपणे अतिशय कमी वेळेत गोठवण्याची प्रक्रिया. या तंत्रज्ञानामुळे अन्नपदार्थांचे तुकडे एकमेकांना चिकटण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. तसेच उत्पादनाचा आकार, पोत आणि गुणवत्ता टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे फ्रोझन फूड्स खरेदी करताना या प्रक्रियेची माहिती समजून घेणे उपयुक्त ठरते. पॅकेटवरील माहितीबरोबरच अन्नपदार्थांच्या निर्मिती प्रक्रियेतील स्वच्छता, कच्च्या मालाची गुणवत्ता, योग्य हाताळणी आणि साठवणूक यांनाही तितकेच महत्त्व आहे. विशेषतः गोठवलेल्या पदार्थांसाठी योग्य तापमान राखणे आवश्यक असते.

सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्सला १७४ कोटींची संरक्षण क्षेत्रातील ऑर्डर


मुंबई (दै. आरंभ पर्व)

सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेड या एरोस्पेस आणि संरक्षण अभियांत्रिकी क्षेत्रातील कंपनीला उत्तर अमेरिकेतील नाटो संरक्षण परिसंस्थेशी संबंधित एका ग्राहकाकडून १९.७ दशलक्ष अमेरिकी डॉलरची (अंदाजे १७४ कोटी रुपये) ऑर्डर मिळाली आहे. ही ऑर्डर १५५ मिमी तोफगोळ्यांसाठी आवश्यक असलेल्या विशेष सहाय्यक उपप्रणालींचे उत्पादन आणि पुरवठा करण्याशी संबंधित आहे. हा करार २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा कंपनीने व्यक्त केली आहे. या उत्पादनाचे काम कंपनीच्या स्वतःच्या उत्पादन परिसंस्थेत केले जाणार आहे. मे २०२६ पासून १५५ मिमी तोफगोळ्यांशी संबंधित मिळालेली ही कंपनीची पाचवी ऑर्डर असल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे तोफखाना दारुगोळा उत्पादनाच्या विविध टप्प्यांमध्ये कंपनीची उपस्थिती वाढत असल्याचे स्पष्ट होते. सिग्माच्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये तोफगोळ्यांचे बाह्य आवरण, फ्यूज, प्रगत बेस-ब्लीड तंत्रज्ञान, लक्ष्यदिशा सुधारण्याचे फ्यूज तंत्रज्ञान आणि सहाय्यक उपप्रणालींचा समावेश आहे.

ऑस्टिओपोरोसिस : हाडांचा 'मूक' आजार, ज्याचे निदान फ्रॅक्चर झाल्यानंतरच होऊ शकते

पुणे (दै. आरंभ पर्व)

कधीकधी किरकोळ पडणे किंवा चालताना पाय चुकीच्या पद्धतीने पडणे यामुळेही हाडाला फ्रॅक्चर होऊ शकते. अशा फ्रॅक्चरला बरे होण्यासाठी अनेक महिने लागू शकतात आणि त्यामुळे दैनंदिन कामे करण्याच्या व्यक्तीच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामागील कारण ऑस्टिओपोरोसिस असते—हा असा आजार आहे ज्यामध्ये हाडे हळूहळू कमकुवत होत जातात आणि फ्रॅक्चर होईपर्यंत अनेकदा कोणतीही स्पष्ट लक्षणे दिसत नाहीत. ऑस्टिओपोरोसिस हा वृद्ध व्यक्तींमध्ये आणि रजोनिवृत्तीनंतरच्या महिलांमध्ये अधिक सामान्य आहे; मात्र वय हा एकमेव जोखीम घटक नाही. कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी ची कमी पातळी, शारीरिक हालचालींचा अभाव, धूम्रपान, काही औषधे आणि कुटुंबातील फ्रॅक्चरचा इतिहास यांमुळेही धोका



वाढू शकतो. डॉ. निशित जयंत शाह, कन्सल्टंट ऑर्थोपेडिक्स, स्पोर्ट्स इंज्युरी आणि रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट तज्ज्ञ सांगतात, "लोक अनेकदा असे समजतात की फ्रॅक्चर केवळ पडल्यामुळे झाले आहे. मात्र, किरकोळ दुखापतीनंतर हाड मोडल्यास हाड आधीपासूनच कमकुवत झालेले असू शकते. ऑस्टिओपोरोसिस अनेक वर्षे निदान न होता राहू शकतो आणि त्याचे पहिले चेतावणीचिन्ह असे फ्रॅक्चर असू शकते, जे वेळेवर तपासणी केल्यास टाळता आले असते. फ्रॅक्चरवर उपचार करण्याइतकेच त्यामागील मूळ कारण ओळखणेही महत्त्वाचे आहे." या आजाराच्या सुरुवातीच्या टप्प्यात क्वचितच लक्षणे दिसतात. मात्र, उंची हळूहळू कमी होणे, शरीराची पुढे झुकलेली ठेवण किंवा सतत पाठदुखी ही मणक्याच्या फ्रॅक्चरची संभाव्य चिन्हे असू शकतात. बोन मिनरल डेन्सिटी टेस्ट, ज्याला सामान्यतः डेक्सा स्कॅन म्हणतात, ऑस्टिओपोरोसिस ओळखण्यास आणि फ्रॅक्चरचा धोका मोजण्यास मदत करू शकते. ज्यांच्यामध्ये जोखीम घटक आहेत किंवा किरकोळ पडल्यामुळे फ्रॅक्चर झाले आहे, त्यांनी योग्य तपासणीसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. हाडांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. पुरेसे कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी असलेला संतुलित आहार, चालण्यासारखा नियमित वजन सहन करणारा व्यायाम तसेच स्नायूंची ताकद आणि शरीराचा समतोल वाढवणारे व्यायाम हाडांची मजबुती टिकवून ठेवण्यास मदत करू शकतात.

थोडक्यात पण महत्वाचे



OPPO F35 मालिकेचे भारतात आगमन

- 'ग्रुप सेल्फी एक्सपर्ट'च्या माध्यमातून दशकपूर्तीचा उत्सव५० मेगापिक्सेलचा अल्ट्रा-वाइड सेल्फी कॅमेरा, ८००० एमएएचची बॅटरी आणि ८० वॅट फास्ट चार्जिंगसह F35 मालिका सादर

पुणे (आरंभ पर्व) : स्मार्टफोन क्षेत्रातील ओपीपीओ कंपनीने भारतातील एफ-मालिकेच्या दहा वर्षांच्या प्रवासानिमित्त नवीन एफ३५ मालिका सादर केली आहे. या मालिकेत ओपीपीओ एफ३५ प्रो ५जी आणि ओपीपीओ एफ३५ ५जी या दोन स्मार्टफोनचा समावेश आहे. 'सेल्फी एक्सपर्ट' म्हणून सुरू झालेल्या या मालिकेचा प्रवास आता 'ग्रुप सेल्फी एक्सपर्ट'पर्यंत पोहोचला असून, एकत्रित क्षण टिपण्यासाठी अधिक प्रगत छायाचित्रण तंत्रज्ञान देण्यावर कंपनीने भर दिला आहे. गेल्या दहा वर्षांत भारतात एफ-मालिकेतील तीन कोटींहून अधिक स्मार्टफोनची विक्री झाल्याचा दावा कंपनीने केला आहे. ग्राहकांच्या बदलत्या गरजा, छायाचित्रणाची आवड आणि सामाजिक माध्यमांवर आठवणी सामायिक करण्याची वाढती प्रवृत्ती लक्षात घेऊन नवीन मालिका विकसित करण्यात आली आहे. ओपीपीओ एफ३५ प्रो ५जीच्या ६ जीबी रॅम व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत ४५,९९९ रुपये, ८ जीबी रॅम व १२८ जीबी प्रकाराची किंमत ४९,९९९ रुपये, तर ८ जीबी रॅम व २५६ जीबी प्रकाराची किंमत ५४,९९९ रुपये आहे.

पिरामल फायनान्सच्या निव्वळ नफ्यात ६७ टक्क्यांची वाढ

मुंबई (आरंभ पर्व) : पिरामल फायनान्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीचा निव्वळ नफा मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ६७ टक्क्यांनी वाढून ५४५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत कंपनीने १,००६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला असून, त्यातही वार्षिक तुलनेत ६७ टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनीच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्तेतही लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत २४ टक्क्यांची वाढ नोंदवत ही मालमत्ता १,१३,११२ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. जुना बंद केलेला व्यवसाय वगळता कंपनीच्या वाढीशी संबंधित मालमत्तेत ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. यावरून कंपनीच्या कर्ज व्यवसायाचा विस्तार आणि आर्थिक कामगिरीतील सकारात्मक प्रगती स्पष्ट होते. पिरामल फायनान्सच्या किरकोळ कर्जवाटपात मागील वर्षाच्या तुलनेत ३४ टक्क्यांची वाढ होऊन ते १४,६४६ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. ग्राहकांकडून कर्जाची सातत्यपूर्ण मागणी आणि कंपनीच्या व्यवसायविस्ताराला मिळणारा प्रतिसाद याचे हे द्योतक मानले जात आहे.

हिंदुस्तान झिंकच्या नफ्यात १४२ टक्क्यांची विक्रमी वाढ



उदयपूर (आरंभ पर्व) : जगातील सर्वात मोठ्या एकात्मिक जस्त उत्पादक कंपन्यांपैकी एक आणि जागतिक स्तरावरील आघाडीच्या चांदी उत्पादकांमध्ये समावेश असलेल्या हिंदुस्तान झिंक लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीच्या प्रसिद्धिपत्रकानुसार, या तिमाहीत महसूल, परिचालन नफा आणि धातू उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली आहे. जस्त उत्पादनाचा खर्च कमी झाल्याने कंपनीच्या नफाक्षमतेलाही बळ मिळाले आहे. कंपनीने दुसऱ्या तिमाहीत परिचालनातून १५,०९३ कोटी रुपयांचा विक्रमी महसूल मिळवला. मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात ७७ टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनीचा व्याज, कर, घसारा आणि कर्जफेडीपूर्व नफा (ईबीआयटीडीए) ९,२८५ कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला असून, त्यात वार्षिक तुलनेत १०८ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. कंपनीने तिमाहीत ६,४१२ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवल्याचे प्रसिद्धिपत्रकाच्या मथळ्यात नमूद करण्यात आले आहे. तथापि, प्रसिद्धिपत्रकाच्या मुख्य मजकुरात निव्वळ नफ्याची रक्कम ११,८८१ कोटी रुपये दिली असल्याने अंतिम आकडेवारीची पडताळणी आवश्यक आहे. कंपनीच्या आर्थिक कामगिरीला उत्पादनातील वाढीचीही साथ मिळाली. दुसऱ्या तिमाहीत खाणीतून काढलेल्या धातूचे उत्पादन २.७१ लाख टनांवर पोहोचले, तर शुद्ध धातूचे उत्पादन २.६४ लाख टन इतके नोंदवण्यात आले. दोन्ही उत्पादनांनी विक्रमी पातळी गाठल्याचे कंपनीने म्हटले आहे. जस्त उत्पादनाच्या खर्चात झालेली घट हे या तिमाहीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. रॉयल्टी वगळता जस्त उत्पादनाचा खर्च प्रतिटन ७०३ अमेरिकी डॉलरपर्यंत खाली आला आहे.

सोनिकवॉलच्या पुण्यातील नवीन कार्यालयाचे उदघाटन

पुणे/बेंगळुरू (आरंभ पर्व) : जागतिक स्तरावर कार्यरत सायबर सिक्युरिटी कंपनी असलेल्या सोनिकवॉलने आज पुण्यात आपल्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन केले. कंपनीच्या भारतातील दीर्घकालीन गुंतवणूक आणि विस्ताराच्या धोरणाला यामुळे आणखी बळ मिळणार आहे.या नवीन सुविधेमुळे कंपनीच्या अभियांत्रिकी आणि विकास कामकाजाला अधिक सक्षम करण्याबरोबरच भारतातील टेक्निकल टॅलेंट पर्यंत कंपनीची पोहोच वाढणार असून,कंपनीच्या जगभरातील ग्राहकांसाठी प्रॉडक्ट इनोव्हेशनला चालना मिळणार आहे. भारताकडे असलेली प्रतिभा, वेगाने विस्तारत असलेली डिजिटल अर्थव्यवस्था आणि सातत्याने बदलणाऱ्या सायबर सिक्युरिटी गरजा यामुळे सोनिकवॉलच्या संशोधन,अभियांत्रिकी आणि भविष्यकेंद्रीत तंत्रज्ञानासाठी भारत हे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.

समाजासाठी झटणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते पुरस्कार वितरण; पत्रकारांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर



पुणे (दै. आरंभ पर्व)

समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्ववान मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा - २०२६' उत्साहात पार पडला. महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. सामाजिक बांधिलकी, संघर्ष, जिद्द आणि कर्तृत्वाचा गौरव करणाऱ्या या सोहळ्याने समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना नवी प्रेरणा दिली.

या सोहळ्याला ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, ज्येष्ठ पत्रकार व लोकमतचे समूह संपादक विजय बाविस्कर, एबीपी माझाच्या उपकार्यकारी संपादक सरिता कौशिक, कोहिनूर ग्रुपचे प्रमुख कृष्णकुमार गोयल आणि सीआयडी अधिकारी सुनील फुलारी यांची प्रमुख उपस्थिती होती. समाजाच्या तळागाळात राहून विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या अनेक व्यक्तींचे योगदान अनेकदा प्रसिद्धीपासून दूर राहते. अशा व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करणे, त्यांच्या यशस्वी वाटचालीला प्रोत्साहन देणे आणि नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करणे, हा या पुरस्कार सोहळ्यामागील मुख्य उद्देश होता. उद्योग, शिक्षण, सामाजिक कार्य, कला, न्याय आणि आरोग्य अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांना पुरस्कार प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. केवळ यशाचा सन्मान नव्हे, तर त्या यशामागील संघर्ष, सातत्य आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारा हा सोहळा ठरला. यावेळी विविध क्षेत्रांत यश मिळविणाऱ्या पुरस्कारार्थींच्या कार्याची माहिती जाणून घेत त्यांनी त्यांच्या योगदानाचे कौतुक केले. समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा समाजातील सकारात्मक कार्याला बळ देणारा उपक्रम असल्याची भावना या सोहळ्यातून व्यक्त झाली. उद्योग क्षेत्रातील योगदानाबद्दल हरीश वरू, अक्षय गंगानी, नितीन भागवत, स्वाती वल्लभ नगरकर, दीपाली कांबळे, आशिष कामठे, श्वेता उपाध्याय, ऋषिकेश फुफाणे, शशांक शिलिमकर, आशिष अग्रवाल आणि डॉ. स्वप्नील अशोक कांबळे यांना उद्योगरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. कृष्णकुमार गोयल यांना कार्य गौरव विशेष सन्मान, मेघराज राजेभोसले यांना कला योगदान गौरव - २०२६, तर पुष्कराज भालचंद्र पाठक यांना शिक्षणरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक क्षेत्रातील योगदानासाठी संजय अग्रवाल, ममता सिंधुताई सपकाळ, ज्योती सावर्डेकर, प्रज्ञा जयेश टांक, प्रशांत कनोजिया आणि ॲड. प्रिया शाह यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. न्याय क्षेत्रातील योगदानाबद्दल ॲड. ओंकार लोंढे आणि ॲड. आबिद मुलाणी यांना न्याययोद्धा पुरस्कार, आरोग्य क्षेत्रातील कार्यासाठी डॉ. सत्यशील नाईक यांना आरोग्यरत्न पुरस्कार, तर फॅशन क्षेत्रातील आयोजनातील योगदानाबद्दल योगेश पवार यांना बेस्ट फॅशन शो ऑर्गनायझर पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. उपाध्यक्ष समीर देसाई आणि जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) सागर बोदगिरे यांनी आयोजनाची जबाबदारी सांभाळली. MIDAS BUILT INFRA आणि NJ GROUP हे कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक होते. समाजासाठी निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तींना सन्मानाचे व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या कार्याची प्रेरणा व्यापक समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या सोहळ्यातून करण्यात आला. कर्तृत्वाचा गौरव, सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि नव्या कार्याची प्रेरणा यांचा संगम ठरलेला हा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

आरोग्याकडे दुर्लक्ष नको : चंद्रकांतदादा पाटील

कार्यक्रमात बोलताना चंद्रकांतदादा पाटील यांनी पत्रकारांच्या आरोग्याचा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. बातम्यांचा पाठपुरावा, धावपळीचे वेळापत्रक आणि कामाचा वाढता ताण यांमुळे पत्रकारांना अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करावे लागते. पत्रकारांच्या आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा असून, या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

स्त्रीच्या नैसर्गिक सौंदर्याचा आणि आत्मप्रेमाचा उत्सव

मुंबई (दै. आरंभ पर्व)

सणासुदीच्या उत्साहात भारतीय साडीपरंपरेचे सौंदर्य आणि स्त्रीच्या आत्मप्रेमाची भावना अधोरेखित करण्यासाठी टाटा समूहातील टायटन कंपनीचा पारंपरिक वस्त्रप्रावरणांचा ब्रँड तनायरा याने 'सोळा शृंगार' ही विशेष मोहीम सादर केली आहे. 'Aap se hi poora, har shringaar' अर्थात 'तुमच्यामुळेच प्रत्येक शृंगार पूर्ण होतो' या संकल्पनेवर आधारित ही मोहीम स्त्रीच्या नैसर्गिक सौंदर्याचा, आत्मविश्वासाचा आणि स्वतःकडे प्रेमाने पाहण्याच्या भावनेचा उत्सव साजरा करते. भारतीय संस्कृतीत शृंगाराला केवळ सजण्यापुरते महत्त्व नसून, त्याला भावनिक आणि सांस्कृतिक अधिष्ठानही आहे. विविध प्रदेशांतील परंपरा, पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या प्रथा आणि वैयक्तिक आवडीनुसार



शृंगाराच्या पद्धती बदलतात. मात्र, आरशासमोर उभे राहून साडीचा पदर सावरणे, दागिने नीट करणे किंवा केसांची रचना सुधारणे हा क्षण प्रत्येक स्त्रीसाठी खास असतो. याच परिचित अनुभवाला केंद्रस्थानी ठेवत ही मोहीम स्त्रीचे व्यक्तिमत्त्व आणि तिच्या स्वतःवरील प्रेमाची भावना प्रभावीपणे मांडते. तनायराच्या 'सोळा शृंगार' या उत्सवी संग्रहामध्ये भारतीय वस्त्रपरंपरेचा समृद्ध वारसा आणि आधुनिक स्त्रीची अभिरुची यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळतो.

मी मॅनेज होणाऱ्यांपैकी नाही

शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारच : तृप्ती देसाई

- मावळातील आरोप-प्रत्यारोपांच्या पार्श्वभूमीवर तृप्ती देसाई यांचा ठाम इशारा
- म्हणाल्या, बदनामीच्या प्रयत्नांना घाबरणार नाही!



पुणे (दै. आरंभ पर्व)

मावळ तालुक्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून सामाजिक कार्यकर्त्या आणि भूमाता ब्रिगेडच्या संस्थापिका तृप्ती देसाई यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आपल्यावर खोटे आरोप करून बदनाम करण्याचा प्रयत्न झाला, तरी आपण घाबरणार नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठीचा लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

यासंदर्भात आपली भूमिका मांडताना तृप्ती देसाई म्हणाल्या, "मावळ तालुक्यात इतरांना पैसे वाटून आणि माझ्यावर काहीही खोटे आरोप करून मला बदनाम केल्यानंतर मी घाबरेन, असे जर कोणाला वाटत असेल, तर त्यांनी तृप्ती देसाईंना ओळखलेलेच नाही. मी काय तुम्हाला मॅनेज होणाऱ्यांपैकी नाही. मी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारच!"

आपल्याला कोणत्याही दबावाला बळी पाडता येणार नाही, असा ठाम संदेश देत देसाई यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून माघार घेणार नसल्याचे संकेत दिले. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठवणे आणि त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, ही आपली भूमिका असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. दरम्यान, "सत्य परेशान हो सकता है, पराजित नहीं" या शब्दांत त्यांनी आपला लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. आरोप, बदनामी किंवा दबावाच्या माध्यमातून आपला आवाज दाबता येणार नाही, असा संदेशही त्यांनी दिला. मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून पुढील काळात हा संघर्ष कोणते वळण घेतो, याकडे आता लक्ष लागले आहे.

ग्राहक हक्क समितीच्यावतीने जैन धर्मार्थ हॉस्पिटलला एक लाख अकरा हजार रुपयांची देणगी

स्व. माधवराव संभुस यांच्या स्मरणार्थ उपक्रम

राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

खेड तालुका ग्राहक हक्क समितीच्या वतीने समितीचे संस्थापक अध्यक्ष स्व.माधवराव संभुस यांच्या स्मरणार्थ येथील जैन धर्मार्थ हॉस्पिटलला एक लाख अकरा हजार एकशे अकरा रुपयांची देणगी देण्यात आली.


चार्तुमासानिमित्त येथील जैन स्थानक येथे उपस्थित असलेल्या जैन मुनींच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात जैन श्रावक संघ तसेच जैन धर्मार्थ हॉस्पिटलचे विश्वस्त संतोष बोथरा, मनोज कासवा, अजय बलदोटा यांच्याकडे मदतीचा धनादेश सुपुर्द करण्यात आला. याप्रसंगी खेड तालुका ग्राहक हक्क समितीचे अध्यक्ष रंगनाथ सुतार, माजी अध्यक्ष रविंद्र गुजराथी,



माजी सरपंच प्रदीप कासवा, माजी उपसरपंच संजय कुंभार, निलेश संभुस, विष्णू बोऱ्हाडे, महेंद्र वाळुंज, प्रा. अविनाश शिंदेकर, परेश शहा, रामदास रणदीवे, छगनलाल ओसवाल आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात रविंद्र गुजराथी म्हणाले, खेड तालुका ग्राहक हक्क समितीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून माधवराव संभुस यांनी ग्राहकांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. परखड आणि सत्य बोलणं हा त्यांचा स्वभाव होता. एखादी गोष्ट चुकीची वाटली तर ती स्पष्टपणे सांगायची आणि सर्वसामान्य माणसाचं काम असेल तर त्यासाठी धावून जायचं, ही त्यांची खासियत होती. सर्वसामान्य माणसाच्या अडचणीच्या वेळी त्याच्या पाठीशी उभं राहण्याची त्यांची वृत्ती अनेकांच्या कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या स्मृती रुग्नसेवेच्या रुपात समाजात चिरंतन रहाव्यात याचसाठी समितीच्या वतीने देणगी रुग्नालयास दिली आहे. यावेळी मान्यवरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय बलदोटा यांनी केले. समितीचे अध्यक्ष रंगनाथ सुतार यांनी आभार मानले.

बंधन म्युच्युअल फंडाची नवी मोहीम पगाराच्या आनंदाला जोडते

मुंबई (दै. आरंभ पर्व)



महिन्याच्या शेवटी खात्यात पगार जमा झाल्याचा संदेश मिळताच चेहऱ्यावर उमटणारे मोठे हास्य अनेकांसाठी आनंदाचा खास क्षण असतो. याच परिचित भावनेला आर्थिक नियोजनाच्या संकल्पनेशी जोडत बंधन म्युच्युअल फंडाने 'बत्तीस वाली स्माईल' ही नवी जाहिरात मोहीम सादर केली आहे. 'सॅलरी वाला प्लॅन' या उपक्रमाचा भाग असलेली ही चित्रफीत विनोद, दैनंदिन जीवनातील प्रसंग आणि सहज समजणाऱ्या संवादांच्या माध्यमातून सिस्टिमॅटिक विथड्रॉवल प्लॅन (एसडब्ल्यूपी) या गुंतवणूक पर्यायाची माहिती देते. महिन्याच्या शेवटी ३१ तारखेनंतर काय येते, असा प्रश्न विचारल्यास सर्वसाधारणपणे उत्तर मिळते, एक तारीख. मात्र, बंधन म्युच्युअल फंडाच्या नव्या जाहिरातीत याचे उत्तर '३२' असे दिले जाते. कारण, पगार जमा झाल्यानंतर चेहऱ्यावर उमटणारे आनंदाचे हास्य म्हणजेच या मोहिमेतील 'बत्तीस वाली स्माईल'! या संकल्पनेवर आधारित चित्रफितीत एक व्यक्ती दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगांमध्ये ३१ नंतर ३२ येते, असा अजब आग्रह धरते. त्याच्या या तर्कामुळे आजूबाजूचे लोक गोंधळून जातात. मात्र, अखेरीस या विधानामागील गमतीशीर अर्थ उलगडतो. त्याच्यासाठी ३२ ही कॅलेंडरवरील तारीख नसून, पैसे जमा झाल्यानंतर चेहऱ्यावर उमटणाऱ्या आनंदी हास्याचे प्रतीक आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश सिस्टिमॅटिक विथड्रॉवल प्लॅन ही आर्थिक संकल्पना सर्वसामान्यांना सोप्या पद्धतीने समजावून सांगणे हा आहे.

व्हिवो नेक्स्ट २०२६ मध्ये प्रीमियम तंत्रज्ञानाचा नवा अध्याय

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

स्मार्टफोन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रीमियम अनुभवांची नवी व्याख्या करण्याच्या दिशेने व्हिवो इंडियाने 'व्हिवो नेक्स्ट २०२६' या कार्यक्रमात महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. या कार्यक्रमात कंपनीने व्हिवो व्ही८०, व्हिवो एक्स फोल्ड६, व्हिवो एस२ एफई आणि ओरिजिनओएस ७ सादर केले. यासोबतच कंपनीच्या



आगामी तंत्रज्ञानविषयक दृष्टिकोनाची झलक दाखवणारे 'व्हिवो व्हिजन डिस्कव्हरी एडिशन' हे मिश्र वास्तव (एमआर) हेडसेटही प्रदर्शित करण्यात आले.ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षांनुसार प्रीमियम तंत्रज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. केवळ तांत्रिक वैशिष्ट्ये किंवा किंमत यांपुरते मर्यादित न राहता, वापरकर्त्यांना मिळणारा अनुभव, दैनंदिन कामांमधील सुलभता आणि तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनातील उपयोग यांना अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर व्हिवोने स्मार्टफोन, घडी घालता येणारे स्मार्टफोन आणि कार्यप्रणाली यांच्या माध्यमातून आपली उत्पादनश्रेणी अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला आहे. नवीन उत्पादनांमध्ये वेगवेगळ्या ग्राहकांच्या गरजांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. व्हिवो व्ही८० हा आशय निर्मिती आणि छायाचित्रणासाठी, एक्स फोल्ड६ हा प्रवासादरम्यान कामकाज आणि एकाच वेळी अनेक कामे करण्यासाठी, तर एस२ एफई हा तरुणांच्या आधुनिक आणि सतत संपर्कात राहणाऱ्या जीवनशैलीसाठी विकसित करण्यात आला आहे. या उपकरणांना जोडणारी ओरिजिनओएस ७ ही कार्यप्रणाली कृत्रिम बुद्धिमत्ता, उत्पादकता, सुलभता आणि संपर्कक्षमता यांचा समन्वय साधण्यावर भर देते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.